पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १९६**

(सभावृत्तांत)

**दिनांक – ०४/११/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार दिनांक **०४/११/२०२०** रोजी **दु.०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.अभिषेक गोविंद बारणे

याशिवाय मा.अजित पवार- अतिरिक्त आयुक्त-२, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्य लेखा परिक्षक, मा.सुभाष इंगळे, मा.दुरगुडे-उपआयुक्त, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.गट्टुवार,मा.घुबे, मा.काळे-कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभागृहात उपस्थित होते.

----------

**मा.सभापती**– सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने सदरची सभा शुक्रवार दिनांक ०६/११/२०२० रोजी दुपारी २.१५ वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १९६**

(सभावृत्तांत)

(दि.०४/११/२०२० दु.२.३० वा. ची तहकूब सभा )

**दिनांक – ०६/११/२०२०** **वेळ – दु. ०२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **दि.०४/११/२०२० दुपारी २.३० वा. ची तहकूब** सभा बुधवार दिनांक **०६/११/२०२०** रोजी **दु.०२.१५ वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

**१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
३. मा.कदम शशिकांत गणपत
४. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
५. मा.संतोष बबन कांबळे
६. मा.अभिषेक गोविंद बारणे

याशिवाय मा.अजित पवार अतिरिक्त आयुक्त-२, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्य लेखा परिक्षक, मा.सुभाष इंगळे-उपआयुक्त, ,मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,मा.डॉ.वाबळे- अधिष्ठाता YCMH, मा.पुजारी, मा.काळे- कार्यकारी अभियंता,मा.माने- लेखाधिकारी PMPML हे अधिकारी सभागृहात उपस्थित होते.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शितल शिंदे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक ०६/११/२०२० दु.२.१५ वा. ची तहकूब सभा बुधवार दिनांक **११/११/२०२०** रोजी दुपारी २.२५ वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

**सभापती** - बुधवार दि.११/११/२०२० रोजी दुपारी ०२.२५ वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती, स्थायी समिती**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १९६**

(सभावृत्तांत)

**(दि.०४/११/२०२० दु.२.३० वा व दि.०६/११/२०२० दु.२.१५ वा. ची तहकूब सभा)**

**दिनांक – ११/११/२०२०** **वेळ – दु. ०२.२५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **दि.०६/११/२०२० दुपारी २.१५ वा. ची तहकूब** सभा बुधवार दिनांक **११/११/२०२०** रोजी **दु.०२.२५ वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. मा.कदम शशिकांत गणपत
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.संतोष बबन कांबळे
४. मा.अभिषेक गोविंद बारणे

याशिवाय मा.संतोष पाटील – अतिरिक्त आयुक्त(१), मा.प्रविण तुपे – अतिरिक्त आयुक्त (३), मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.सुभाष इंगळे – मा.लोणकर, मा.दुरगुडे – उप आयुक्त मा.तांबे, मा.निकम – सह शहर अभियंता, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.गायकवाड – मुख्य उद्यान अधिक्षक मा.वाघुंडे, मा.गट्टूवार, मा.पाटील, -कार्यकारी अभियंता, मा.गोफणे – जेष्ठ वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता YCMH, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, हे अधिकारी सभागृहात उपस्थित होते.

----------

सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने उपस्थित सन्मा.सदस्यांनी सदरची सभा बुधवार दिनांक १८/११/२०२० रोजी दुपारी २.२५ वाजेपर्यंत तहकूब केली.

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १९६**

(सभावृत्तांत)

(दि.०४/११/२०२० दु.२.३० वा, दि.०६/११/२०२० दु.२.१५ वा. व दिनांक ११/११/२०२० दु.२.२५ वा. ची तहकूब सभा )

**दिनांक – १८/११/२०२०** **वेळ – दु. ०२.२५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **दि.११/११/२०२० दुपारी २.२५ वा. ची तहकूब** सभा बुधवार दिनांक **१८/११/२०२०** रोजी **दु.०२.२५ वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे - सभापती
२. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
३. मा.कदम शशिकांत गणपत
४. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
५. मा.संतोष बबन कांबळे
६. मा.अभिषेक गोविंद बारणे
७. मा.बुर्डे सुवर्णा विकास

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.संतोष पाटील – अतिरिक्त आयुक्त(१), मा.अजित पवार – अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.सुभाष इंगळे – मा.चितळे,मा.दुरगुडे – उप आयुक्त, , मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.गायकवाड – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता YCMH, मा.चव्हाण, मा.खाबडे, मा.घुबे, मा.पवार, मा.वाघुंडे, मा.काळे – कार्यकारी अभियंता, मा.गोफणे – जेष्ठ वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.दांगट – प्रशासन अधिकारी, , मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी सभागृहात उपस्थित होते.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.पंकज भालेकर

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक १८/११/२०२० दुपारी २.२५ वा. ची तहकूब सभा सोमवार दिनांक **०७/१२/२०२०** रोजी दुपारी **२.२०** वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती** - सोमवार दि.०७/१२/२०२० रोजी दुपारी ०२.२० वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती, स्थायी समिती**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १९६**

(सभावृत्तांत)

(दि.०४/११/२०२० दु.२.३० वा, दि.०६/११/२०२० दु.२.१५ वा., दिनांक ११/११/२०२० दु.२.२५ वा. व दिनांक १८/११/२०२० दु.२.२५ वा. ची तहकूब सभा)

**दिनांक – ०७/१२/२०२०** **वेळ – दु. ०२.२० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **दि.१८/११/२०२० दुपारी २.२५ वा. ची तहकूब** सभा सोमवार दिनांक **०७/१२/२०२०** रोजी **दु.०२.२० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
५. मा.कदम शशिकांत गणपत
६. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
७. मा.संतोष बबन कांबळे
८. मा.अभिषेक गोविंद बारणे
९. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१०.मा.फुगे भिमाबाई पोपट

याशिवाय मा.अजित पवार – अतिरिक्त आयुक्त (२), मा.प्रविण तुपे – प्र.अतिरिक्त आयुक्त(३) तथा सह शहर अभियंता, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.सुभाष इंगळे, – उप आयुक्त, मा.जोशी, मा.बोदडे – सहाय्यक आयुक्त, मा.सवणे – सह शहर अभियंता,मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता YCMH, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.मोरे, मा.घुबे, मा.पवार, मा.वाघुंडे, मा.काळे, मा.टकले, मा.शिंदे – कार्यकारी अभियंता, मा.गोफणे – जेष्ठ वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.आगळे – प्रशासन अधिकारी, मा.गायकवाड – जनता संपर्क अधिकारी, हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक ०७/१२/२०२० दुपारी २.२० वा. ची तहकूब सभा बुधवार दिनांक **०९/१२/२०२०** रोजी दुपारी **२.२०** वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती** - बुधवार दि.०९/१२/२०२० रोजी दुपारी ०२.२० वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती, स्थायी समिती**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १९६**

(सभावृत्तांत)

(दि.०४/११/२०२० दु.२.३० वा, दि.०६/११/२०२० दु.२.१५ वा., दिनांक ११/११/२०२० दु.२.२५ वा., दिनांक १८/११/२०२० दु.२.२५ वा. ची दिनांक व ०७/१२/२०२० दु.२.२० वा. ची तहकूब सभा)

**दिनांक – ०९/१२/२०२०** **वेळ – दु. ०२.२० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **दि.०७/१२/२०२० दुपारी २.२० वा. ची तहकूब** सभा बुधवार दिनांक **०९/१२/२०२०** रोजी **दु.०२.२० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे मयूर पांडुरंग
७. मा.कलाटे राहुल तानाजी
८. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९. मा.कदम शशिकांत गणपत
१०. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
११. मा.संतोष बबन कांबळे
१२. मा.अभिषेक गोविंद बारणे
१३. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१४. मा.फुगे भिमाबाई पोपट
१५. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१६. मा.सुलक्षणा राजू धर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.संतोष पाटील – अतिरिक्त आयुक्त(१), मा.अजित पवार – अतिरिक्त आयुक्त (२), मा.प्रविण तुपे – प्र.अति.आयुक्त(३) तथा सह शहर

अभियंता, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.सुभाष इंगळे – उप आयुक्त, मा.भालकर, मा.सवणे – सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.बोदडे – सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्राचार्य औ.प्र.कैंद्र, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता YCMH, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.भोसले, मा.मोरे, मा.घुबे, मा.पवार, मा.देशमुख, मा.वाघुंडे – कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.आगळे – प्रशासन अधिकारी, मा.गायकवाड – जनता संपर्क अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी  हे अधिकारी सभागृहात उपस्थित होते.

---------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.भिमाबाई फुगे

अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक ०९/१२/२०२० दुपारी २.२० वा. ची तहकूब सभा बुधवार दिनांक **१६/१२/२०२०** रोजी दुपारी **२.१५** वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती** - बुधवार दि.१६/१२/२०२० रोजी दुपारी ०२.१५ वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती, स्थायी समिती**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १९६**

(सभावृत्तांत)

(दिनांक ०४/११/२०२० दु.२.३० वा. ची दिनांक ०६/११/२०२० दु.२.१५ वा. दिनांक ११/११/२०२० दु.२.२५ वा. दिनांक १८/११/२०२० दु.२.२५ वा. दि.०७/१२/२०२० दु.२.२० वा व दि.०९/१२/२०२० दु.२.२० वा. ची तहकूब सभा)

**दिनांक – १६/१२/२०२०** **वेळ – दु. ०२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **दि.०९/१२/२०२० दुपरी २.२० वा. ची तहकूब** सभा सोमवार दिनांक **१६/१२/२०२०** रोजी **दु.०२.१५ वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती
२) मा.चोंधे आरती सुरेश
३) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५) मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६) मा.कलाटे राहुल तानाजी
७) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८) मा.कदम शशिकांत गणपत
९) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०) मा.संतोष बबन कांबळे
११) मा.अभिषेक गोविंद बारणे
१२) मा.बुर्डे सुवर्णा विकास
१३) मा.फुगे भिमाबाई पोपट
१४) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१५) मा.सुलक्षणा राजू धर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.सुभाष इंगळे, मा.सुभाष इंगळे, मा.चारटणकर, मा.चितळे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.दुरगुडे – उप आयुक्त, , मा.भालकर, मा.सवणे – सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.बोदडे – सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड – प्र.मुख्य उद्यान

अधिक्षक, मा.पाटील – प्राचार्य औ.प्र.केंद्र, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता YCMH, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.जुंधारे, मा.ओंभासे, मा.मोरे, मा.देशमुख, मा.वाघुंडे, मा.रामगुडे, मा.काळे, मा.गट्टूवार, मा.पाटील, मा.घुबे, मा.टकले – कार्यकारी अभियंता मा.गोफणे – जेष्ठ वैद्यकीय अधिकारी,मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.गायकवाड – जनता संपर्क अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी, मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी उपस्थित होते.

---------

ठराव क्रमांक – ७७२९ विषय क्रमांक – १

दिनांक – १६/१२/२०२० विभाग – मध्य.सा.भां., वैद्यकिय

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/३४२/२०२०, दि.०१/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) (क) नुसार कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी M/s.S.D.Biosensor Healthcare Pvt. Ltd., Haryana यांचेकडून शासन निर्णयाच्या अनुषंगाने Standard Q Covid-19 Ag detection Kit – 4000 Kits, 25 Test per Kit (1,00,000 Tests) 12% GST सह म्हणजे प्रति टेस्ट र.रु.४५०/- प्रमाणे अधिक १२% GST र.रु.५४/- असा १ टेस्टकरीता र.रु.५०४/- प्रमाणे थेट पध्दतीने 1,00,000 Tests खरेदी करणेकामी येणा-या एकुण र.रु.५,०४,००,०००/- (अक्षरी र.रु.पाच कोटी चार लाख फक्त) चे खर्चास तातडीक बाब असलेने M/s.SD Biosensosr Healthcare Pvt. Ltd., Haryana यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण क्रमांक५(२)(२) नुसार करारनामा न करता ५%अनामत रक्कम घेवून थेट पध्दतीने खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७३० विषय क्रमांक – २

दिनांक – १६/१२/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/१३५४/२०२०, दि.२६/०९/२०२०

विषय – कोरोना कोविड १९ रूग्णांवर वैद्यकिय उपचार करणेसाठी आवश्यक असणारी औषधे / साहित्य खरेदी करणेबाबत.

विषय क्र.२ चा विचार दि.२३/१२/२०२० चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७७३१ विषय क्रमांक – ३
दिनांक – १६/१२/२०२० विभाग – आरोग्य मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/९/कावि/२०५/२०२०, दि.०८/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत ई-निविदा नोटीस क्र.३/२०१७-१८ व ८/२०१७-१८ प्रसिध्द करुन म.न.पा.चे अ, ब, क, ड, इ, फ, ग व ह क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते/गटर्स साफसफाई करणेकामी किमान वेतन दराने कामगार उपलब्ध करणे याकामासाठी २ वर्ष कालावधीसाठी किमान वेतनावरील सेवा शुल्कावर निविदा मागविण्यात आली होती. त्यानुसार ८ क्षेत्रिय कार्यालयाकडे किमान वेतन दरानुसार ७ संस्थांमार्फत १५२९ सफाई कामगार पुरविण्यात आलेले आहे. या ७ संस्थापैकी ५ संस्थांचे कामाची मुदत दिनांक २६/१२/२०१९ व २ संस्थांची कामाची मुदत दि.३१/१२/२०१९ रोजी संपुष्टात आल्याने सदर १ ते ५ या संस्थांना दिनांक २६/१२/२०१९ ते दि.२५/३/२०२० पर्यत व अ.क्र.६ व ७ या संस्थांना दि.३१/१२/२०१९ ते दि.३०/३/२०२० पर्यंत मुदतवाढ देणेत आली होती. सदर संस्थांची कामाची मुदत संपुष्टात आलेने १ ते ५ या संस्थांना दि.२६/३/२०२० ते दि.२५/९/२०२० व अ.क्र.६ व ७ या संस्थांना दि.१/४/२०२० ते ३०/९/२०२० पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे. तथापि सदर कामाची मुदत दि.२५/९/२०२० व दि.३०/९/२०२० रोजी संपुष्टात येत असलेने व यांत्रिक पध्दतीने रस्ते साफसफाई कामाची निविदा प्रक्रिया रद्द झालेने व मनुष्यबळाव्दारे रस्ते/गटर्स साफ सफाई कामाची निविदा प्रक्रिया कामकाज सुरू असून या कामकाजाकरीता अंदाजे ६ महिने कालावधी लागणार असलेने सदर कामास किमान ६ महिने कालावधीकरीता तथा निविदा प्रक्रिया पुर्ण होवून प्रत्यक्ष कामकाज सुरू होईल यापैकी जे प्रथम होईल तोपर्यंत मुदतवाढ देवून याकामी येणा-या र.रु.१६,८०,०४,७२८/- (अक्षरी र.रू.सोळा कोटी ऐंशी लाख चार हजार सातशे आठ्ठावीस फक्त) इतके अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच संबंधीतांबरोबर ६ महिने कालावधीचा किंवा टेंडर मंजूर झाले तर दोन्हीपैकी ज्याची मुदत अगोदर संपेल त्याप्रमाणे करारनामा करून घेणे तसेच त्यांना कामाचे आदेश देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३(क) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७३२ विषय क्रमांक – ४
दिनांक – १६/१२/२०२० विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/३८१/२०२०, दि.२३/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.69/5/2019-20 अन्वये प्रभाग क्र.८ मध्ये ठिकठिकाणी फुटपाथ, दुभाजक व रस्ता सुशोभिकरणाची कामे करणेकामी (अर्बन डिझाईन प्रमाणे)

मे.ए.आर.कन्स्ट्रक्शन नि.र.रू.8,30,08,244/- (अक्षरी र.रु.आठ कोटी तीस लाख आठ हजार दोनशे चव्वेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.8,21,46,714/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.8,21,46,714/- पेक्षा 5.00% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2019-20 चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 9.87% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.7,80,39,378/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.7,44,579/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,16,950/- = एकुण र.रु.7,89,00,907/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७३३ विषय क्रमांक – ५

दिनांक – १६/१२/२०२० विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/३८०/२०२०, दि.२३/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.82/2/2019-20 अन्वये प्र.क्र.२ सेक्टर नं.१६ राजे शिवाजीनगर मधील रस्ते अद्ययावत पध्दतीने करणेकामी मे.अजवाणी इन्फ्रा.प्रा.लि. नि.र.रू.30,35,50,546/- (अक्षरी र.रु.तीस कोटी पस्तीस लाख पन्नास हजार पाचशे शेहेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.30,06,55,163/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.30,06,55,163/- पेक्षा 8.00% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2019-20 चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 11.57% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.27,66,02,750/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.26,74,382/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.2,21,000/- = एकुण र.रु.27,94,98,132/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७३४ विषय क्रमांक – ६
दिनांक – १६/१२/२०२० विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/१५६/२०२०, दि.२६/१०/२०२०

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.78/5/2019-20 अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीचे आवशक्यतेनुसार सुशोभिकरण करणेकामी M/s.S.S.ENTERPRISES नि.र.रू.83,71,549/- (अक्षरी र.रू.त्र्याऐंशी लाख एक्काहत्तर हजार पाचशे एकोणपन्नास फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.83,42,439/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.83,42,439/- पेक्षा 25.25% कमी म्हणजेच र.रु.62,35,973/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.7,150/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.21,960/- = एकुण र.रु.62,65,083/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७३५ विषय क्रमांक – ७
दिनांक – १६/१२/२०२० विभाग – माहिती व जनसंपर्क
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.सहा. आयुक्त यांचे पत्र क्र.माजंस/२/कावि/३२०/२०२०, दि.२१/१०/२०२०

मा.सहा. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.स्थायी समिती ठराव क्र.२६०६, दि.२५/०४/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करणेकामी शॉल/स्मृतिचिन्ह, बुके, फुले व श्रीफळ न देता पर्यावरणपूरक एक झाडाचे रोप व एक पुस्तक देऊन सन्मान करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार मान्यवरांचा सत्कार करणेकामी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत कोटेशन नोटीस क्र.०२/२०१८-१९ व कोटेशन नोटीस क्र.०५/२०१९-२० अन्वये पुस्तक खरेदी करण्यात आली आहे. कोटेशन नोटीस क्र.०२/२०१८-१९ अन्वये २०० नग 'भारताचे संविधान' १०% सवलतीने मूलनिवासी बुक डेपो यांचेकडून, २०० नग डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम लिखित 'अग्निपंख' १५% सवलतीने व २०० नग प्रा. नामदेवराव जाधव लिखित 'शिवाजी द मॅनेजमेंट गुरु' २४% सवलतीने पंकज पुस्तकालय यांच्याकडून सवलतीच्या दरात खरेदी करण्यात आली आहेत. तसेच कोटेशन क्र.०५/२०१९-२० अन्वये ५०० नग युनिक फिचर्स यांचे 'महाराष्ट्र दर्शन' हे पुस्तक २०% सवलतीच्या दराने समकालीन प्रकाशन यांचेकडून खरेदी करण्यात आले आहे. तरी सन २०१८-१९ व २०१९-२० मध्ये मनपाला भेट देणा-या विविध मान्यवरांचा, कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांचा व

दर महिन्याला सेवानिवृत्त होणा-या अधिकारी/ कर्मचारी यांच्या सत्कारासाठी तसेच मा.महापौर, मा.उपमहापौर, स्थायी समिती सभापती, आयुक्त यांच्याकडे भेट देणारे अभ्यागत यांना भेट देणेसाठी पुस्तक खरेदीकामी सन २०१८-१९ साठी झालेल्या र.रु.१,२०,४००/- (अक्षरी र.रु. एक लाख वीस हजार चारशे फक्त) व सन २०१९-२० साठी झालेल्या र.रु.२,००,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख फक्त) च्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७३६ विषय क्रमांक – ८

दिनांक – १६/१२/२०२० विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/४३२/२०२०, दि.२६/१०/२०२०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.3/46/2020-21 अन्वये सन २०१८-१९ साठी जलक्षेत्र क्र.बी/५ अंतर्गत असणा-या MIDC बिजलीनगर पाण्याची टाकी रंगविणे, शौचालय बांधणे, वॉचमन क्वॉर्टर बांधणे व इतर स्थापत्य विषयक तसेच पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणेकामी (दुसरी मागणी) मे.आकाश इन्फ्रास्ट्रक्चर नि.र.रू.44,92,712/- (अक्षरी र.रु.चव्वेचाळीस लाख ब्याण्णव हजार सातशे बारा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.42,57,347/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.42,57,347/- पेक्षा 28% कमी म्हणजेच र.रु.30,65,290/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.2,07,465/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.27,900/- = एकुण र.रु.33,00,655/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७३७ विषय क्रमांक – ९

दिनांक – १६/१२/२०२० विभाग – पशुवैद्यकिय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पवै/३/कावि/१५६/२०२०, दि.२८/१०/२०२०

विषय – नेहरूनगर, पिंपरी स्थित छोटे पाळीव प्राणी दहन मशिन (Pet incinerator करिता शुल्क आकारणेबाबत.

विषय क्र.९ चा विचार दि.२३/१२/२०२० चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७७३८ विषय क्रमांक – १०

दिनांक –१६/१२/२०२० विभाग – पशुवैद्यकिय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(२) यांचे पत्र क्र.पवै/२/कावि/२२३/२०२०, दि.०७/१०/२०२०

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रक्षेकातील मोठे जनावरे (गाय वर्ग म्हैस वर्ग) पकडणेकामी खाजगी संस्थेची नियुक्ती करणेबाबत..

विषय क्र.१० चा विचार दि.२३/१२/२०२० चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७३९ विषय क्रमांक – ११

दिनांक –१६/१२/२०२० विभाग – भुमि आणि जिंदगी

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(२) यांचे पत्र क्र.भुजि/६/कावि/४४३/२०२०, दि.२७/१०/२०२०

मा.अति. आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका “अ” क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत से.नं.२३ वाहतुकनगरी मधील आरक्षित वाहन तळ ११ महिने कालावधीसाठी सर्वात जास्त मासिक भाडे देणारांस भाडे तत्वावर देणेकामी इच्छुक संस्था, व्यक्ती यांचेकडून ई- निविदा पध्दतीने ई-निविदा नोटीस क्र.०२/२०१९–२०२० अन्वये निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर निविदेतील सर्वोच्च निविदाधारकाचे दर दर्शविणारा तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | मनपा दर ११ महिन्याचे भाडे, शासन व मनपा कराव्यतिरिक्त) | प्रथम सर्वोच्च निविदा धारकाचे नांव | निविदा धारकाचा देय दर र.रु. |
|---|---|---|---|
| | ३८,५०,०००/- | मे.तनिष्क एंटरप्रायजेस | ५१,२०,४५०/- |

वरील प्रमाणे निविदाधारकांची सर्वोच्च दराची निविदा स्विकृत करुन निविदा अटी व शर्ती प्रमाणे पुर्तता करीत असलेने रक्कम भरुन घेऊन सदर वाहन तळाचा ११ महिने कालावधीसाठी ताबा देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ ब नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७४० विषय क्रमांक – १२

दिनांक – १६/१२/२०२० विभाग – लेखा

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/१४/कावि/६७९/२०२०, दि.२६/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सध्या कर्मचारी सेवानिवृत्त होण्याचे प्रमाण जास्त असुन या सेवानिवृत्त होणा-या तसेच मयत कर्मचा-यांची सेवानिवृत्ती प्रकरणे तातडीने निकाली काढणे आवश्यक आहे. तथापि लेखा विभागाकडील मर्यादित कर्मचारी संख्या विचारात घेता सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यासाठी विलंब होत असुन त्यामुळे कर्मचा-यांच्या तक्रारी येत आहेत. कर्मचारी महासंघाच्या विविध मागण्याबाबत दि.५/१०/२०२० रोजी आयोजित बैठकीमधील सभावृत्तांमध्ये जे मनपाचे कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत व ७ व्या वेतन आयोगा प्रमाणे सेवानिवृत्तीचे कामकाजाची ज्यांना माहिती आहे अशा दोन कर्मचा-यांची सेवानिवृत्त कर्मचा-यां करिता देय असलेल्या रकमा अदा करणे करिता लेखा विभागाने मानधनावर स्वतंत्र नियुक्ती करावी असे नमुद केले आहे. ही बाब विचारात घेऊन सेवानिवृत्ती प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी लेखा विभागाच्या पेन्शन कक्षासाठी महानगरपालिकेमधुन सेवानिवृत्त झालेल्या व सदर कामाची माहिती असलेल्या कर्मचा-यापैकी खालील कर्मचा-यांना आदेशाचे तारखेपासुन ६ महिने कालावधीसाठी मानधनावर नेमणूका देणे आवश्यक आहे.

१) श्री.वसंत मधुकर शिंदे, सेवानिवृत्त लेखापाल

२) श्री.बाजीराव केशवराव ओंबळे, सेवानिवृत्त उपलेखापाल

सबब, वरील सेवानिवृत्त कर्मचा-यांना लेखा विभागाच्या पेन्शन कक्षासाठी आदेशाचे तारखे पासुन ६ महिने कालावधीसाठी मानधनावर नेमणूका करणे तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७ डिसेंबर २०१६ नुसार मासिक पारिश्रमिक मंजुर करणेस मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषय संदर्भात सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना यापुर्वी सेवानिवृत्तीच्या दिवशीच सत्काराच्या कार्यक्रमात पेन्शनची ऑर्डर ग्रज्युटी पेन्शन विक्री रजा रोखीकरण भविष्य निर्वाह निधीच्या रकमेची धनादेश दिले जात असे मध्यंतरीच्या काळात खंड पडल्याने पुन्हा सेवानिवृत्तीच्या दिवशीच सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवानिवृत्तीच्या कारयक्रमामध्ये पेन्शनची ऑर्डर, ग्रॅज्युटी, भविष्य निर्वाह निधीची रक्कम व अर्जित रजा रोखीकरणे रक्कम देण्याची कार्यवाही करणेत यावी. यासाठी लेखा विबागाचे परिपत्रकानुसार मुदतीत कागदपत्रांची पुर्तता करून प्रकरण लेखा विभागाकडे पाठविणे हे सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या विभागाची जबाबदारी आहे. मुदतीत प्रकरण लेखा विभागाकडे सादर न केल्यास व सेवानिवृत्तीचे लाभ कर्मचा-यांस विलंबाने मिळाल्यास संबंधित विभागाचे आस्थापना

विषयक काम करणारे कर्मचा-यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७४१ विषय क्रमांक – १३

दिनांक – १६/१२/२०२० विभाग – नागरी सुविधा केंद्र

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नासुके/२/कावि/२३१/२०२०, दि.२९/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पि.चिं.मनपाचे नागरी सुविधा विभागान्वये खाजगी तत्वावर नागरी सुविधा केंद्रचालक नियुक्त करणेकामी पाचव्या टप्प्यामध्ये एकूण १३ अर्जदारांपैकी अंतिम पात्र ठरलेल्या खालील तक्त्यात नमूद एकूण ०७ अर्जदारांना महानगरपालिका RFP मधील अटी/शर्तींनुसार प्रती सेवा र.रु.२०/- नागरिकांकडून स्विकारण्यात येऊन त्यापैकी र.रु.५/- महापालिकेस प्राप्त होणार आहे. तसेच, मिळकत कर, पाणीपट्टी इत्यादी बिलासाठी स्विकृत होणारे भरणा प्रती पावती र.रु.५/- याप्रमाणे महापालिकेमार्फत अदा करणेस प्रथम तीन वर्ष कालावधीसाठी करारनामा करुन खाजगी तत्वावर नागरी सुविधा केंद्रचालक नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

| नागरी सुविधा केंद्र (पाचवा टप्पा) पात्र अर्जदारांची यादी | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **प्रभाग क्र.** | **नव्याने आवश्यकता** | **पात्र अर्जंची संख्या** | **पात्र अर्जदारांचे नाव** |
| 1 | 5 | 1 | 1 | श्रीम.गौरी विठ्ठल भंडलकर/श्रीम.रिंकु विठ्ठल भंडलकर |
| 2 | 9 | 3 | 1 | श्री.किशोर चिंतामण ब्राम्हणकर |
| 3 | 12 | 1 | 1 | श्री.रितेश राजेद्रं सोनवणे |
| 4 | 15 | 2 | 1 | श्री.बशीर शामु नदाफ |
| 5 | 21 | 1 | 1 | श्री.प्रविण मधुकर वडवे / श्री.संतोष मधुकर वडवे |
| 6 | 26 | 3 | 1 | श्री.सचिन कुंडलिक बिचकर / श्रीम.माधुरी सचिन बिचकर |
| 7 | 28 | 2 | 1 | श्रीम.सायली भुपेश शैलार |
| **एकुण** | | | 7 | |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७४२ विषय क्रमांक – १४
दिनांक – १६/१२/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.अति. आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/५/कावि/९८०/२०२०, दि.२३/१०/२०२०

मा.अति. आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाच्या बांधकाम परवानगी व माहिती व तंत्रज्ञान विभागासाठी २० नग कॉम्प्युटर वर्कस्टेशन खरेदीकामी केंद्र शासनाच्या गव्हर्मेंट ई-मार्केटप्लेस वर GeM Bid No.GEM/2020/B/733331 प्रसिध्द करुन मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये मे.विट्रॅग कॉम्प्युटर्स प्रा.लि., सांगली यांनी सादर केलेली निविदा एकूण र.रु.२६,५८,०००/-(सर्व करांसह) लघुत्तम प्राप्त झाली असुन स्विकृत करण्यात आली आहे. त्यानुसार मनपाच्या बांधकाम परवानगी व माहिती व तंत्रज्ञान विभागासाठी २० नग कॉम्प्युटर वर्कस्टेशन मे.विट्रॅग कॉम्प्युटर्स प्रा.लि., सांगली यांच्याकडून त्यांनी सादर केलेल्या दरानुसार करारनामा करुन खरेदी करणेस व खरेदी होणारा खर्च एकूण र.रु.२६,५८,०००/-(अक्षरी र.रू.सव्वीस लाख अठ्ठावन्न हजार फक्त)(सर्व करांसह)ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७४३ विषय क्रमांक – १५
दिनांक – १६/१२/२०२० विभाग – क क्षेत्रिय
सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.संतोष काबळे
संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.कक्षेका/आ१५/कावि/३५७/२०२०, दि.०८/०९/२०२०

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील औष्णिक धुरिकरणासाठी डिझेलवर चालणारे दोन, तीन चाकी रिक्षा टेम्पो (तीन रिक्षा टेम्पो) वाहनचालकासह भाडयाने पुरविणेकामी मा.अति.आयुक्त यांचेकडील दिनांक २५/०२/२०२० चा मान्य प्रस्तान्वये दि.२४/०२/२०२० ते दि.२३/०५/२०२० अखेर ०३ महिने कालावधीकरीता मे.अथर्व स्वयंमरोजगार औद्योगिक सेवा सहकारी संस्था मर्या. यांना क क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात औष्णिक धुरीकरण करणे या कामकाजाकरीता प्रति दिन प्रति रिक्षा टेम्पो र.रू.५३९/- या दराप्रमाणे काम करून घेणेस मान्यता देणेत आलेली आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.७००८ दि.०८/०५/२०२० अन्वये प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत आली आहे. मे.अथर्व स्वयंमरोजगार औद्योगिक सेवा सहकारी संस्था मर्या. यांना मा.स्थायी समिती ठराव क्र.७२४३ दि.१५/०७/२०२० अन्वये प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत आली आहे. मे.अथर्व स्वयंमरोजगार औद्योगिक सेवा सहकारी संस्था मर्या. यांना आदेश क्र.कक्षे/आ१५/कावि/३६५/२०२० दि.२०/०८/२०२० अन्वये दि.२४.०५.२०२० ते दि.२३.०८.२०२० या कालावधीसाठी आदेश देणेत आला असुन त्याप्रमाणे कामकाज करून घेणेत

आलेले आहे. तथापी कोविड-19 प्रादुर्भाव असल्याने क क्षेत्रीय कार्यालयामार्फत औष्णिक धुरीकरण कामाकरीता नविन निविदा कार्यवाही पुर्ण होणेस काही कालावधी लागणार असल्याने व कामाची तातडी व निकड लक्षात घेता पुढील कालावधीसाठी मे.अथर्व स्वयंमरोजगार औद्योगिक सेवा सहकारी संस्था यांना दि.२४/०८/२०२० ते दि.३०/९/२०२० अखेर मुदतवाढ देणे आवश्यक आहे. मे.अथर्व स्वयंमरोजगार औद्योगीक सेवा.सहकारी संस्था मर्या. या संस्थेकडुन क क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात औष्णिक धुरीकरण करण्यासाठी वॅन फॉग मशिन ठेवुन कामकाज करण्यासाठी आवश्यक डिझेलवर चालणारे तीन चाकी रिक्षा टेम्पो (तीन रिक्षा टेम्पो) वाहन चालकासह भाड्याने घेणेकरीता या कामकाजाकरीता वाहने उपलब्ध करून घेवून त्या उपलब्ध साधारण ३३ दिवसाकरीता प्रति दिवस प्रति वाहन र.र.५३९/- प्रमाणे १ वाहनाचे २६ दिवसाचा खर्च र.रु.१४,०१४/- तीन वाहनाचे र.रु.४२,०४२/- प्रमाणे ३३ दिवसासाठी येणा-या खर्च र.रू.५३,३६१/- (अक्षरी र.रू.त्रेप्पन हजार तीनशे एकसष्ठ फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७४४ विषय क्रमांक – १६

दिनांक – १६/१२/२०२० विभाग – पशुवैद्यकिय

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.पवै/०२/कावि/२४९/२०२०, दि.२९/१०/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांची शिफारस विचाराच घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील दुध न देणा-या गायी (भाकड), अपंग व आजारी गायी, जनावरे आदींच्या विशेषत्वाने सांभाळ करणे, योग्य आहार पुरविणे इ. कामकाजाकरीता प्राप्त लघुत्तम दर निविदाधारक मे.चंद्रभागा गो शाळा संवर्धन संस्था ट्रस्ट यांचे १०० गायांसाठी प्रति माह र.रु.१,६२,४००/- (अक्षरी र.रू.एक लाख बासष्ठ हजार चारशे फक्त) ३ वर्षा करीताचा लघुत्तम दर स्विकृत्त करुन संस्थे समवेत करारनामा करणे व याकामी येणा-या ३ वर्षांचा प्रत्यक्ष खर्चास विभागाच्या “चिखली येथील कोंडवाडा चालविण्याचा खर्च” या लेखाशिर्षावरुन खर्च करण्यास मान्यता देणेबाबत मा.अति.आयुक्त(२) यांची मागणी असली तरी, कळवितने महाल ट्रस्ट यांना अशा प्रकारची अन्य नवीन कामे देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७४५ विषय क्रमांक – १७

दिनांक – १६/१२/२०२० विभाग – क क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कक्षेका/स्था/कावि/१५१/२०२०, दि.२९/१०/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

क क्षेत्रिय कार्यालयातील प्रभाग क्र.२ मधील मुख्यालयाचे सन २०२०-२१ च्या

अंदाजपत्रकामधे कामाच्या तरतूदीमध्ये खालील प्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र | लेखाशिर्ष | सन २०२०-२१ ची मुळ तरतुद | वाढ करावयाची तरतूद | घट करावायाची तरतूद | सन २०२०-२१ साठी एकूण आवस्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२ मधील गट नं ६०६० आरक्षण १/४४६ येथे माध्यमिक शाळा इमारत बांधणे | ७६ | ३० | विशेष योजना | २,००,००,००० | १,५०,००,००० | | ३,५०,००,००० |
| २ | प्रभाग क्र.२ जाधववाडी कुदळवाडी मधील अस्तित्वातील अंतर्गत रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे | ३१ | ४७ | विशेष योजना | ६,८०,००,००० | २,५०,००,००० | | ९,३०,००,००० |
| ३ | प्रभाग क्र.२ पुणे नाशिक महामार्ग ते ग.क्र.१०६२ पर्यंतचा १८ मी. डी.पी. रस्ता विकसित करणे | ३२ | ५९ | विशेष योजना | ४,००,००,००० | | १,००,००,००० | ३,००,००,००० |
| ४ | प्रभाग क्र.२ चिखली मधील भैरवनाथ मंदिर ते विसीवा चौक ते आळंदी पर्यंत ३० मी. रस्ता विकसित करणे | ३२ | ६६ | विशेष योजना | २,००,००,००० | | २,००,००,००० | |
| ५ | प्रभाग क्र.२ मध्ये पुणे नाशिक महामार्गाचे पश्चिमे कडील नाला विकसित करणे (भारतमाता चौक) भाग २ | ७६ | २४ | विशेष योजना | २,५०,००,००० | | १,००,००,००० | १,५०,००,००० |
| | एकूण | | | | १७,३०,००,००० | ४,००,००,००० | ४,००,००,००० | १७,३०,००,००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.**

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती, स्थायी समिती**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/१२५५/२०२०
दिनांक –१७/१२/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**प्रत** - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**(क्र.मभां/०८/कावि/१३५४२०२० दि.२६/०९/२०२० विषय क्र.२ चे लगत)**

1073 प्रपत्र 'ब'

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११ ०१८.
मध्यवर्ती भांडार विभाग
अल्पमुदतीची जाहीर सूचना क्रमांक -१७/२०२०-२१ (औषधे खरेदी)
कामाचे नाव -पिंपरी चिंचवड मनपाचे विविध दवाखाने/रुग्णालये,केअर सेंटर मध्ये कोरोना (Covid 19) रुग्णावर वैद्यकिय उपचार करणेसाठी आवश्यक असणारे औषधे खरेदी करणेकामी प्राप्त दरपत्रक तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | औषधाचे नाव | मागणी संख्या | अंदाजपत्रकीय दर | एकूण र.रु | मे.केप्स फार्मा | मे.ओमनी हेल्थकेअर | मे.ऑस्टिन हेल्थकेअर | मे.महेश सर्जिकल अंड फार्मास्युटिकल | प्राप्त लघुत्तम दर | कमी करून दिलेले दर | एकूण र.रु. | टक्केवारी | एकूण प्राप्त दरपत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Etophyline + Theophylline tab | 100000 | 0.77 | 76600 | 0 | 0 | **0.4** | 0 | 0.4 | 0.4 | 40000 | -47.78% | 1 |
| 2 | Vitamin C 500mg | 300000 | 1.4 | 420000 | 0 | 0 | **1.18** | 0 | 1.18 | 1.18 | 354000 | -15.71% | 1 |
| 3 | Zinc sulphate 50mg tab | 100000 | 1.5 | 150000 | 0 | 0 | **0.79** | 0 | 0.79 | 0.79 | 79000 | -47.33% | 1 |
| 4 | Hydroxychoroquine 200mg Tab. | 10000 | 4.5 | 45000 | 0 | 0 | **4.29** | 0 | 4.29 | 4.29 | 42900 | -4.57% | 1 |
| 5 | Hydroxychoroquine 400mg Tab. | 10000 | 8.5 | 85000 | 0 | 0 | **8.34** | 0 | 8.34 | 8.34 | 83400 | -1.88% | 1 |
| 6 | Sporlac Ds Tab. | 20000 | 1.2 | 24000 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | | 0 |
| 7 | Lopinavir + Retinavir Tab. | 2000 | 28.66 | 57320 | **21.85** | **0** | 0 | 0 | 21.85 | 21.59 | 43180 | -24.66% | 1 |
| 8 | Enaxaparin 0.4ml Inj. | 60000 | 153 | 9180000 | 170.09 | **167** | 191.43 | 222 | 167 | 167 | 10020000 | 9.15% | 4 |
| | | | | **10037920** | | | | | | | **10662480** | 6.22% | |

फार्मासिस्ट

उपलेखापाल
भांडारपाल

लेखाधिकारी 18.9.

भांडार अधिकारी

सहाय्यक आयुक्त

अतिरिक्त आयुक्त (२)

1049 प्रपत्र 'ब'

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११ ०१८.
मध्यवर्ती भांडार विभाग
अल्पमुदतीची जाहीर सूचना क्रमांक -१७/२०२०-२१ (सर्जिकल साहित्य खरेदी)
कामाचे नाव -पिंपरी चिंचवड मनपाचे विविध दवाखाने/रुग्णालये,केअर सेंटर मध्ये कोरोना (Covid -19) रुग्णावर वैद्यकिय उपचार करणेसाठी आवश्यक असणारे सर्जिकल साहित्य खरेदी करणेकामी प्राप्त दरपत्रक तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | साहित्याचे नाव | मागणी संख्या | अंदाजपत्रकिय दर | एकूण र.रु | मे.ऑस्टिन हेल्थकेअर | मे.महेश सर्जिकल अंड फार्मास्युटिकल | प्राप्त लघुत्तम दर | कमी करून दिलेले दर | एकूण र.रु. | टक्केवारी | एकूण प्राप्त दरपत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3Ply Face mask | 300000 | 1.5 | 450000 | **1.57** | 2.940 | 1.57 | 1.54 | 462000 | 2.66% | 2 |
| 2 | Non sterile Latex Examination Gloves Small | 200000 | 4.4 | 880000 | 5.63 | **5.002** | 5.002 | 4.82 | 964000 | 9.54% | 2 |
| 3 | Non sterile Latex Examination Gloves Medium | 200000 | 4.4 | 880000 | 5.63 | **5.002** | 5.002 | 4.82 | 964000 | 9.54% | 2 |
| 4 | Non sterile Latex Examination Gloves large | 60000 | 4.4 | 264000 | 5.63 | **5.002** | 5.002 | 4.82 | 289200 | 9.54% | 2 |
| | | | | **2474000** | | | | | 2679200 | | |
| 5 | Nitrile Gloves Medium | 1000000 | 5.1 | **5100000** | 7.38 | **6.625** | 6.625 | 6.38 | 6380000 | 25.09% | 2 |
| 6 | Nitrile Gloves Large | 1000000 | 5.1 | 5100000 | 7.38 | **6.625** | 6.625 | 6.33 | 6380000 | 25.09% | 2 |

फार्मासिस्ट उपलेखापाल भांडारपाल लेखाधिकारी भांडार अधिकारी सहाय्यक आयुक्त

अतिरिक्त आयुक्त (2)